

निखिल शिवाजी बोऱ्हाडे
अभिष्टचिंतन सोहळा
कार्यक्रमाची रूपरेषा
प्राध्यापक श्री.वसंत हंकारे सर यांचे
'न समजलेले आई-बाप'
या विषयावर जाहीर व्याख्यान
मंगळवार दि.05 ऑगस्ट 2025 रोजी
दुपारी 02 वाजता
बुधवार दि.06 ऑगस्ट 2025
सकाळी 09 वाजता
सफाई कर्मचारी सन्मान
सकाळी 09 ते सायं. 05
भव्य महिला भजनी स्पर्धा
सकाळी 10 ते सायं.05
भव्य रक्तदान शिबीर (प्रत्येक रक्तदात्यास जर्किंग भेट)
सायंकाळी 06 वाजता
१० वी १२ वी गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ
मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, डॉ.डी.वाय.पाटील दंत महाविद्यालय आणि रुग्णालय यांच्या सौजन्याने
दंत चिकित्सा शिबीर
सायंकाळी 07 वा.
अभिष्टचिंतन सोहळा
ठिकाण: श्री. निखिल शिवाजी बोऱ्हाडे जनसंपर्क कार्यालय
वुड्सविले सेल्स ऑफिस समोर, बोऱ्हाडेवाडी
MEDIA CART

# पिंपरी-चिंचवडमध्ये नव्या अग्निशमन केंद्रांची उभारणी वेगात

## अग्निसुरक्षेसाठी महत्त्वाची पावले : नव्या केंद्रांसाठी जागा निश्चिती आणि टेंडर प्रक्रिया सुरू

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार वेगाने होत असताना आपत्कालीन सेवा वेळेवर पोहोचणे गरजेचे ठरत आहे. त्यामुळे महापालिकेच्या अग्निशमन विभागाने शहरातील विविध भागांमध्ये नव्या अग्निशमन केंद्रांची उभारणी तसेच नियोजन सुरू केले असून काही केंद्रांचे काम अंतिम टप्प्यात आहे, तर काहींसाठी जागा निश्चिती व निविदा प्रक्रिया सुरू आहे.




सध्या एकूण १० अग्निशमन केंद्रे कार्यरत असून त्यामध्ये पिंपरी येथील मुख्य अग्निशमन केंद्र, भोसरी उपअग्निशमन केंद्र, मोशी उपअग्निशमन केंद्र,, चिखली उपअग्निशमन केंद्र, तळवडे उपअग्निशमन केंद्र, रहाटणी उपअग्निशमन केंद्र, थेरगाव उपअग्निशमन केंद्र, प्राधिकरण उपअग्निशमन केंद्र, चोविसावाडी उपअग्निशमन केंद्र, नेहरूनगर उपअग्निशमन केंद्र इत्यादी केंद्रांचा समावेश आहे. या केंद्रांमधून शहराच्या विविध भागांमध्ये २४X७ सेवा देण्यात येते. औद्योगिक आणि निवासी भागांसाठी ही केंद्रे महत्वाची ठरत आहेत.

पिंपरी चिंचवड शहर झपाट्याने विकसित होत असून त्यानुसार सुरक्षितता उपायांची आवश्यकता अधिक महत्त्वाची ठरते आहे. वाढत्या लोकसंख्येप्रमाणे प्रतिसाद वेळ कमी करणे, शहराच्या प्रत्येक भागात अग्निशमन सेवा पोहोचवणे, मोठ्या औद्योगिक वसाहतींसाठी विशेष सुविधा निर्माण करणे, रहिवासी वस्त्यांमध्ये, नव्या टाउनशिपमध्ये तत्काळ मदत देणे या अनुषंगाने आणखी अग्निशमन केंद्रे बांधण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

सध्या पुनावळे, दिघी, निगडी प्राधिकरण येथील हेडगेवार भवन, पिंपरी येथील अग्निशामक मुख्यालय याठिकाणी सशक्तता वाढवण्यासाठी या अग्निशमन केंद्रांचे बांधकाम सुरु आहे.

एवढेच नव्हे तर महापालिकेने भविष्यात प्रस्तावित केलेली एकूण ३ अग्निशमन केंद्रांकरिता भूसंपादन करण्याचे कार्य प्रस्तावित केले आहे. त्यामध्ये पिंपळे निलख येथील संरक्षण खात्याचीही जागा उपलब्ध करण्याचा प्रयत्न विभागाकडून सुरु आहे. नगररचना व इ क्षेत्रीय (स्थापत्य) यांचे मार्फत एकत्रित रित्या चऱ्होली, वर्ल्ड प्राईड सिटी परिसरातील अग्निशमन केंद्रां करिता भूसंपादन करून बांधकाम करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. भोसरी येथील एमआयडीसीमधील एफ-२ ब्लॉक येथे क क्षेत्रीय स्थापत्य यांच्यामार्फत अग्निशमन केंद्र बांधकाम विषयक टेंडर प्रक्रिया राबवीण्यात येत आहे.

> शहराचा झपाट्याने होणारा विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता, प्रत्येक प्रभागात आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम करणे ही वेळेची गरज आहे. नव्या अग्निशमन केंद्रांमुळे मदतीचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल, आणि नागरिकांचा जीव व मालमत्तेचा अधिक चांगल्या पद्धतीने बचाव करता येईल. भविष्यातील आकस्मिक संकटांचा वेळीच मुकाबला करता यावा, यासाठी ही केंद्रे ही केवळ यंत्रणा नसून नागरिकांसाठी सुरक्षा कवच ठरणार आहेत.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> नव्या केंद्रांमध्ये आधुनिक उपकरणे, जलद प्रतिसाद देणारे व्हेईकल्स आणि प्रशिक्षित कर्मचारी असतील. प्रत्येक केंद्र स्थानिक गरजेनुसार आणि त्या भागातील संभाव्य धोके लक्षात घेऊन यंत्रणा उभी करत आहे. औद्योगिक क्षेत्रांमध्ये केमिकल फायरसाठी विशेष उपाययोजना, तर रहिवासी भागात धुरामुळे होणाऱ्या समस्यांवर लक्ष केंद्रित केले जाईल. या अग्निशामक केंद्रांच्या माध्यमातून आम्ही केवळ आग विझवण्यावर नव्हे तर सुरक्षेवरही भर देणार आहोत.
>
> **- उमेश ढाकणे, सहाय्यक आयुक्त, अग्निशमन विभाग.**

# 'रेड झोन'प्रमाणे सोसायटीधारकांनाही 50% मालमत्ता कर सवलत द्या!

## पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशनची मागणी; महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेने नुकताच रेड झोनमध्ये येणाऱ्या मिळकतधारकांना मालमत्ता करात ५०% सवलत देण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे शहरातील हजारो प्रामाणिक कर भरणाऱ्या सोसायटीधारकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. शेखर सिंह यांना निवेदन देत ठाम मागणी केली आहे की, "सवलत द्यायचीच असेल, तर शहरातील हजारो सोसायटीधारकांनाही ती दिली गेली पाहिजे. अन्यथा हे निर्णय प्रामाणिक करदात्यांवर अन्याय करणारे ठरतील."

फेडरेशनच्या म्हणण्यानुसार, सोसायट्यांना आजही मूलभूत नागरी सुविधा मिळत नाहीत, नियमित पाणीपुरवठ्याऐवजी टँकरवर अवलंबून रहावे लागते. रस्त्यांची अवस्था दयनीय आहे; काही ठिकाणी रस्तेच नाहीत. कचरा व्यवस्थापनात हलगर्जीपणा, स्वच्छतेचा अभाव आहे वाहतूक नियोजनाचा पूर्णतः अभाव आहे. "आम्ही नियमित कर भरतो, तरीही आम्हाला मूलभूत सुविधा नाकारल्या जातात. त्याचवेळी काही ठिकाणी केवळ स्थानिक राजकीय दबावाखाली सवलती दिल्या जातात – हे अन्यायकारक आहे."

### सवलत हवीच, अन्यथा लोकशाही मार्गाने लढा...

**» फेडरेशनने इशारा दिला आहे की जर सोसायटीधारकांनाही ५०% सवलत त्वरित जाहीर केली नाही, तर शहरातील सर्व सोसायट्यांचे प्रतिनिधी एकत्र येऊन लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडतील. "राजकीय फायद्यासाठी निवडक घटकांना सवलत देणं म्हणजे प्रामाणिक करदात्यांची थट्टा आहे. हा अन्याय आम्ही खपवून घेणार नाही," असा सजग इशारा फेडरेशनने दिला आहे.**

> महापालिकेकडून आम्हा सोसायटीधारकांकडून नियमित कर घेतला जातो, पण त्याच्या बदल्यात पाणी, रस्ते, कचरा व्यवस्थापन यांसारख्या मूलभूत सुविधा मात्र दिल्या जात नाहीत. आणि अशा परिस्थितीत जर केवळ रेड झोनमध्ये येणाऱ्या मिळकतधारकांना ५०% कर सवलत दिली जात असेल, तर ती प्रामाणिक करदात्यांच्या विश्वासाला तडा देणारी गोष्ट आहे. हा अन्याय थांबवण्यासाठी सोसायटीधारकांनाही तत्काळ ५०% सवलत द्यावी, अन्यथा आम्ही लोकशाही मार्गाने आंदोलन करणार आहोत.
>
> **- संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली-मोशी-पिंपरी-चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.**

# पुण्याची प्रारूप प्रभाग रचना राज्य सरकारकडे

## 2017 च्या प्रभाग रचनेनुसारच साधारणपणे यंदाचीही प्रारूप प्रभाग रचना करण्यात आली

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेला प्रारुप प्रभाग रचना आराखडा महापालिकेने नगरविकास विभागाला सादर केला आहे. २०१७ च्या प्रभाग रचनेनुसारच साधारणपणे यंदाचीही प्रारूप प्रभाग रचना करण्यात आली आहे. मात्र, महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेली गावे, वाढलेली लोकसंख्या आणि मतदारसंख्या यामुळे प्रभागांच्या आकारामध्ये काही बदल झाला आहे. ही प्रारूप प्रभाग रचना पारदर्शीपणे तयार करण्यात आल्याचा दावा महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी केला.




राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या साडेतीन ते चार वर्षांपासून रखडलेल्या आहेत. इतर मागासवर्गीय आरक्षणाच्या न्यायालयीन वादामुळे या निवडणूक खोळंबल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांत निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर राज्य सरकारने महापालिका प्रशासनाला नव्याने प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले होते. शासनाच्या नगरविकास विभागाने दिलेल्या वेळापत्रकानुसार महापालिकांनी प्रारूप प्रभाग रचना तयार करण्याचे काम केले आहे. पुणे महापालिकेनेही प्रारूप प्रभाग रचना तयार केली असून, सोमवारी ही रचना सादर करण्यात आली. नगर विकास विभाग ९ ऑगस्टला ही प्रारुप रचना निवडणूक आयुक्तांकडे पाठविणार आहे.

याबाबत अधिक माहिती देताना महापालिका आयुक्त नवल किशोर राम म्हणाले, 'महापालिकेने पारदर्शकपणे प्रारूप प्रभाग रचनेचे काम केले आहे. प्रारूप प्रभाग रचनेचे काम २०१७ च्या निवडणुकीप्रमाणेच 'अँटिक्लॉकवाइज' करण्यात आले आहे. चार सदस्यांचा प्रभाग असल्याने २०११ सालच्या लोकसंख्येनुसार प्रभाग रचना २०१७ प्रमाणेच करण्यात आली आहे. परंतु २०१७ नंतर महापालिकेत ३२ गावांचा समावेश झाला आहे. लोकसंख्येतही चार लाखांनी वाढ झाली आहे. यामुळे प्रभागांच्या आकारात बदल करणे अपेक्षित आहे. प्रारूप रचना अत्यंत पारदर्शकपणे राबविण्यात आली आहे.'

### भाजप पदाधिकाऱ्यांवर हस्तक्षेपाचा आरोप


» पुणे महापालिका निवडणुकीची प्रारूप प्रभाग रचना करताना यामध्ये सत्ताधारी असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी हस्तक्षेप केल्याचा आरोप महाविकास आघाडी कडून केला जात आहे. महापालिकेतील माजी सभागृहनेते तसेच भाजपचे इतर पदाधिकारी यांनी भाजपला फायद्याचा ठरेल अशी प्रभाग रचना करून घेतल्याची चर्चा महापालिकेत सुरू आहे. महापालिका आयुक्तांसह इतर अधिकाऱ्यांवर दबाव निर्माण करत प्रारूप प्रभागाची रचना करण्यात आली आहे. विशेष म्हणजे महायुतीत सत्तेत असलेल्या शिवसेना (शिंदे) पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या कोणत्याही पदाधिकाऱ्याला विश्वासात न घेता भाजपच्या मोजक्या पदाधिकाऱ्यांनी यामध्ये लक्ष घातल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे.

# पुण्यातील पदपथांबाबत महापालिकेचा मोठा निर्णय

## कानबाई उत्सव खान्देशी संस्कृतीच्या एकजुटीचा प्रयत्न : गिरीश महाजन

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील अनेक रस्त्यांवरील पदपथांची दुरवस्था झालेल्या तक्रारींची दखल घेऊन पदपथांची पाहणी करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. सुरुवातीच्या टप्प्यात 'मिशन १५' आणि 'मिशन १७' अंतर्गत कामे करण्यात आलेल्या २८ रस्त्यांची पाहणी केली जाणार आहे. पथ विभागातील ५५ अधिकारी ही पाहणी करणार असून, त्याचा अहवाल तीन दिवसांनी होणाऱ्या बैठकीत ठेवला जाणार आहे.




शहरातील अनेक रस्त्यांवर पदपथ अस्तित्वातच नाही. त्यामुळे पायी चालणाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागते. यामुळे काही अपघातदेखील झाले आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या पथ विभागाने शहरात चालण्यास योग्य व अयोग्य पदपथांची पाहणी करण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिकेच्या पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी ही माहिती दिली. पथ विभागाच्या वतीने पदपथांचे स्थापत्य लेखापरीक्षण केले जाणार आहे. यासाठी २८ रस्ते निवडण्यात आले आहेत. या रस्त्यांची लांबी १५० ते १७५ किलोमीटर इतकी आहे.

प्रत्येक अभियंत्याला ३ ते ४ किलोमीटर रस्त्याची पाहणी करावी लागणार आहे. या पाहणीत पदपथांची अवस्था काय आहे, याचा सविस्तर अहवाल तयार करून तो पुढील तीन दिवसांत सादर करावा लागणार आहे. हा अहवाल मिळाल्यावर अधिकाऱ्यांची बैठक घेऊन त्यांना पथपथ दुरुस्तीच्या सूचना देणार असल्याचे पावसकर यांनी सांगितले.

**उत्सवाच्या काळातील नियोजन सुरू**

आगामी गणेशोत्सवाच्या काळात रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांचा त्रास नागरिकांना होऊ नये तसेच उत्सवाच्या काळात रस्ते सुस्थितीत राहावे यासाठी पथ विभागाने नियोजन केले आहे. लक्ष्मी रस्ता, टिळक रस्ता, बाजीराव रस्ता, शिवाजी रस्ता, यासह कुमठेकर रस्ता, केळकर रस्ता आणि अन्य महत्त्वाच्या रस्त्यांची जबाबदारी कनिष्ठ अभियंत्यांकडे देण्यात आली आहे. तसेच गणेश मंडळांसाठी देखील महापालिकेने नियमावली जाहीर केली आहे.

मांडव टाकण्यासाठी खोदलेले खड्डे स्वखर्चाने बुजवावेत, उत्सवानंतर तीन दिवसांत मंडप, सजावट तसेच इतर अतिक्रमण काढून तातडीने जागा मोकळी करावी अशा सूचनांचा या नियमावलीत समावेश आहे. महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या नियमावलीमध्ये २०२२ पासून पाच वर्षापर्यंत मंडप, कमानी यासाठी परवानगी घ्यावी लागणार नाही. नवीन गणेश मंडळांना मात्र २०१९ च्या नियमावलीनुसार परवानगी घ्यावी लागणार आहे. तसेच विविध परवानगी घेण्यासंदर्भात पोलीस, महापालिका यांनी एक खिडकी योजना सुरु करणार आहे.

> शहरातील पदपथ नागरिकांना चालण्यासाठी योग्य आहेत की नाही, याची पाहणी केली जाणार आहे. यासाठी ५५ अभियंत्यांकडे जबाबदारी देण्यात आली आहे. हे अभियंते पदपथांची पाहणी करून अहवाल सादर करणार आहेत.
>
> **– अनिरुद्ध पावसकर, मुख्य अभियंता, पथ विभाग.**

# हिंजवडी आयटी पार्कमध्ये पुन्हा 'मेट्रोझिप'

## 'हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशन'चा मेट्रोझिप खासगी बससेवा सुरू करण्यासाठी पुढाकार

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमधील वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी 'हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशन'ने मेट्रोझिप ही खासगी बससेवा सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे आयटी पार्कमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बस उपलब्ध होणार असून त्यामुळे छोट्या खासगी वाहनांची संख्या कमी होऊ शकेल.

इंडस्ट्रीज असोसिएशनने २०१४मध्ये मेट्रोझिप ही बससेवा सुरू केली होती. यात अनेक खासगी कंपन्या सहभागी झाल्या होत्या. या माध्यमातून ११३ बसमधून दररोज सुमारे ६ हजार कर्मचारी प्रवास करीत होते. त्यामुळे आयटी पार्कमधील कर्मचाऱ्यांची खासगी वाहने कमी संख्येने रस्त्यावर येऊन वाहतूक कोंडी टळत होती. करोनाकाळात बहुसंख्य आयटी कर्मचाऱ्यांना घरूनच काम करण्याची मुभा दिली गेल्याने मार्च २०२० पासून ही सेवा बंद पडली होती. मात्र आता बहुतांश कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना कार्यालयात येणे बंधनकारक केले आहे.

मात्र बसची सोय नसल्याने खासगी वाहनांचा वापर वाढला आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीत भर पडत असल्याने हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशनने पुन्हा 'मेट्रोझिप' बससेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे (आरटीओ) विनंती करण्यात आली असून लवकरच निर्णय अपेक्षित आहे. येत्या महिनाभरात ही सेवा सुरू होण्याची शक्यता आहे.




> 'मेट्रोझिप'मुळे वाहनांची संख्या कमी होऊन वाहतूक कोंडीची समस्याही कमी झाली होती. आता पुन्हा ही बससेवा सुरू होणार आहे. त्यासाठी कोकोराइड्स या कंपनीशी करारही करण्यात आला आहे.
>
> **– शंकर सालकर, वाहतूक सेवाप्रमुख, हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशन.**

> वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी खासगी वाहनांचा वापर कमी होणे गरजेचे आहे. कर्मचाऱ्यांसाठी बससेवा सुरू केल्यास ही समस्या काही प्रमाणात कमी होईल. नियमानुसार या सेवेला परवानगी दिली जाईल.
>
> **– संदेश चव्हाण, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड.**

> औद्योगिक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांसाठी पीएमपीएमएलने बससेवा सुरू केली आहे. त्याबरोबरच कर्मचाऱ्यांसाठी खासगी बससेवा सुरू होत असेल, तर ही चांगली बाब आहे. यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल.
>
> **– नितीन वानखेडे, मुख्य अभियंता, एमआयडीसी.**

# महापालिकेकडून महत्वाच्या रस्त्यांची अभियंत्यांवर जबाबदारी

## प्रत्येक अभियंत्यावर जबाबदारी निश्चित करून संबधित रस्त्यावर उत्सवाच्या काळात खड्डे पडू नयेत

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सव तसेच पाठोपाठ येत असलेल्या नवरात्रोत्सवात नागरिकांना तसेच मंडळांना त्रास होऊ नये, यासाठी महापालिकेच्या पथ विभागाने शहरातील महत्वाच्या रस्त्यांवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला आहे. महत्वाची मंडळे असलेल्या आणि मिरवणूक काढण्यात येणाऱ्या रस्त्यांवर विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचना अभियंत्यांना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक अभियंत्यावर जबाबदारी निश्चित करुन संबधित रस्त्यावर उत्सवाच्या काळात खड्डे पडू नयेत, यासाठी विशेष काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

महापालिकेचे पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी ही माहिती दिली. गणेशोत्सवासाच्या काळात रस्त्यावर कोणतेही अडथळे निर्माण होऊन उत्सवात विघ्न येऊ नये, यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे. ज्या मार्गावर गणेशोत्सवासाठी मोठी गर्दी होते. तसेच मिरवणुका काढल्या जातात.

अशा लक्ष्मी रस्ता, शिवाजी रस्ता, टिळक रस्ता, बाजीराव रस्ता, नेहरू रस्ता, केळकर रस्ता, कुमठेकर रस्ता तसेच शास्त्री रस्त्यासह अन्य महत्वाच्या रस्त्यांवर उत्सवाच्या काळात कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी महापालिका प्रयत्न करणार आहे. या रस्त्यांवरील त्रुटी दूर करण्यासाठी महापालिकेच्या पथ विभागातील अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार असून हे अधिकारी दररोज त्यांना जबाबदारी दिलेल्या रस्त्याची पाहणी करुन त्यातील त्रुटी दूर करणार आहेत.

उत्सव साजरा करताना मंडळांना आवश्यक असलेली आणि महापालिकेच्या माध्यमातून केली जाणारी कामे पूर्ण करण्यास प्राधान्यक्रम राहणार आहे. यासाठी संबधित मंडळांच्या पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. गणेशोत्सवपूर्वी तसेच उत्सवाच्या काळात संबधित अभियंत्यावर या रस्त्याची दररोज पाहणी करुन त्यामध्ये आढळलेल्या अडचणी दूर करण्याची जबाबदारी राहणार असल्याचे पावसकर यांनी सांगितले.

**तक्रारीसाठी हेल्पलाइन**

मंडपासाठी खोदलेले खड्डे सिमेंट क्राँक्रिटने दुरुस्त करणे बंधनकारक असणार आहे. नागरिकांना वाहतुकीला अडथळा होणार नाही, तसेच त्यांना ध्वनिप्रदूषणाचा त्रास होणार नाही याची काळजी मंडळाने घ्यावी, असे महापालिकेने स्पष्ट केले आहे. तसेच तक्रारीसाठी महापालिकेने हेल्पलाईन सुरु केली आहे. नागरिकांना HTTP://COMPLAINT.PUNECORPORATION.ORG, या संकेतस्थळावर तसेच टोल फ्री क्रमांक १८०० १०३ ०२२२, मोबाईल ॲप : PUNE CONNECT, व्हॉट्स अप नंबर : ९६८९९०००२ येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




### मंडळांसाठी नियमावली

**» गणेशोत्सव तसेच नवरात्रौत्सवाच्या निमित्ताने महापालिकेने मंडळांसाठी नियमावली जाहीर केली आहे. मंडव टाकण्यासाठी खोदलेले खड्डे स्वखर्चाने बुजवावेत, उत्सवानंतर तीन दिवसांत मंडप, सजावट तसेच इतर अतिक्रमण काढून तातडीने जागा मोकळी करावी अशा सूचनांचा या नियमावलीत समावेश आहे. महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या नियमावलीमध्ये २०२२ पासून पाच वर्षापर्यंत मंडप, कमानी यासाठी परवानगी घ्यावी लागणार नाही. नवीन गणेश मंडळांना मात्र २०१९ च्या नियमावलीनुसार परवानगी घ्यावी लागणार आहे. तसेच विविध परवानगी घेण्यासंदर्भात पोलीस, महापालिका यांनी एक खिडकी योजना सुरु करणार आहे.**